Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

Issue (I)

12 January 2019
SPECIAL ISSUE – 92

# Recent Trends In Public Adminstration : Theories, Practice & Future

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editor of This Issue**
**Dr. Bidwe T.S.**
Assit. Prof. Head of Dept.
Public Administraion
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net
© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 400/-

**RESEARCH JOURNEY** International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676
Special Issue 92 , Recent Trends in Public Administration : Theories, Practice & Future | January 2019 | UGC Approved No. 40705

# Index


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Good Governance and Indian Democracy | Vijay Maroti Magare | 7 |
| 2. | Good Governance at a Glance | Dr. Santram Prabhakar Mundhe | 9 |
| 3. | सुशासन | प्रा.दीक्षित एस.डी. ,<br>प्राचार्य डॉ.पिंपळे बी.एस | 11 |
| 4. | नवलोकप्रशासन व व्यवस्थापन | प्रा. कल्याण ज्ञानोबा वडमारे | 13 |
| 5. | लोक प्रशासन काल, आज आणि उद्या | प्रा. प्रविण पांडुरंगराव लोणारकर | 15 |
| 6. | लोकनिवड दृष्टिकोन | डॉ.मयंक मोर, डॉ.जे.बी. कांगणे | 17 |
| 7. | सुशासन संकल्पना | डॉ.एस.एन.आकुलवार | 19 |
| 8. | लोकनिवड दृष्टीकोन | डॉ. स्मिता काशिनाथराव मरवाळीकर | 21 |
| 9. | सार्वजनिक धोरणाची प्रक्रिया | प्रा. बापूराव भिमराव जाधव | 23 |
| 10. | लोक निवड दृष्टिकोन - लोक प्रशासन | प्रा. डॉ.भोपटे अमित जनार्धन | 25 |
| 11. | व्यवस्थापन आणी प्रेरणा : खेळडूचे मनोबल वाढवणारे घटक | डॉ. डोंगरे माधव रा. | 27 |
| 12. | नवलोक व्यवस्थापन | हेळंबे हनमंत बालाजी | 29 |
| 13. | सुशासन तथा ई-प्रशासन | डॉ.भालेराव सुधाकर नारायण | 31 |
| 14. | नवलोक व्यवस्थापण संकल्पना आणि नवलोक व्यवस्थापनाचे परिणाम | डॉ.प्रा.शिंदे बि.एस. | ३४ |
| 15. | सुशासन - विकासाची अनिवार्य अट | प्रा. प्रविण पांडुरंगराव लोणारकर | 37 |
| 16. | सार्वजनिक क्षेत्रात खाजगी भागीदारी | डॉ.शिंदे सुरेखा सदाशिवराव | 39 |
| 17. | लोकप्रशासनातील एक नवप्रवाह - नवलोक व्यवस्थापन | प्रा.शेख मोहंमद हनिफ इस्माईलसाब | 41 |
| 18. | लोक प्रशासन आणि सुशासन | डॉ. आरदवे एस.डी | 43 |
| 19. | आजच्या युगातील सु-शासन आणि स्मार्ट प्रशासन | प्रा. डॉ.जे.के. भालेराव | 45 |
| 20. | नवलोकप्रशासन- लोकप्रशासनाचे नवे क्षितिज | प्रा. गिता गिरवलकर | 47 |
| 21. | छत्रपती शिवाजी महाराजांचे सुशासन (सुराज्य) | प्रा.डॉ. पांडुरंग पंढरीनाथ मुंढे | 52 |
| 22. | सार्वजनिक क्षेत्रात खाजगी भागीदारी लाभ, अडचणी व भवितव्य | डॉ. चंद्रशेखर मिले | ५५ |
| 23. | नागरिकांची सनद | डॉ.दिपक एस वाघमारे | 60 |
| 24. | **Cyber Crimes Affecting Business Administration** | Dr. M.S. Bisen | 63 |
| 25. | **E- Governance and E-Health in India: A Review** | **Ms.Seema Nikalje** | 66 |
| 26. | **It Act For Good Governance** | **Dr. Khakare Vikas** | 69 |
| 27. | माहिती तंत्रज्ञानाचा लोकप्रशासनावरील प्रभाव | डॉ.शिवाजी लक्ष्मणराव राठोड | 72 |
| 28. | भारतातील ई-प्रशासन वाटचाल व सद्यस्थिती | डॉ. गोविंद पेढले | 74 |
| 29. | लोकप्रशासनात ई-प्रशासनाची उपयोगिता : | डॉ.पिनाटे किरण प्रल्हादराव | 76 |
| 30. | भारतीय प्रशासकीय बदलात माहिती तंत्रज्ञानाची भूमिका | डॉ. प्रमोद मा. आयेगावे | 78 |
| 31. | ई-शासन | प्रा. डॉ. दिंडे सुधिर प्रकाशराव,<br>श्री. चव्हाण पंडित विठ्ठल | 80 |

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676
Special Issue 92 , Recent Trends In Public Administration : Theories, Practice & Future
January 2019
ISSN: 2348-7143
UGC Approved No. 40705

# नवलोक व्यवस्थापन

**ढेंडे हणमंत बालाजी**
सह प्राध्यापक व विभाग प्रमुख, लोकप्रशासन विभाग, र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई

बदलत्या सामाजिक आर्थिक परिस्थितीनुसार लोकप्रशासनामध्ये प्रशासकिय संघटना व नोकरशाहीच्या भूमिकेत सकारात्मक परिवर्तन घडवून आणणे. नागरिकांना गुणवत्तापूर्ण सेवा प्रदान करणे, सेवा प्रदान कार्यात व्यवस्थापन तत्व व माहिती तंत्रज्ञानाचा अवलंब करणे. या उद्देशाने आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक संघटना, विचारवंत यांच्या विचारमंथनातून लोकप्रशासनात नविन संकल्पना, सिध्दांत मांडले गेले. जसे नवलोकप्रशासन, नवलोक व्यवस्थापन, सुशासन, ई-प्रशासन, संघटीत शासन इ. लोकप्रशासनास व्यवस्थापनाची जोड देवून व्यवसायाभिमुख, बाजारोन्मुखी बनवण्यावर भर देण्यात आला. कारण जगातील सर्व राष्ट्रातील सार्वजनिक क्षेत्रांची अवस्था बिकट होत होती. त्यावरील एक उपाय म्हणून व्यवस्थापकीय दृष्टीकोनाची शिफारस केली. व्यवस्थापनाच्या माध्यमातून सार्वजनिक क्षेत्रात कार्यक्षमता, काटकसर व परिणामकारकता या आधारे परिवर्तन घडवून आणता येते तसेच सार्वजनिक क्षेत्राची व संघटनेची विश्वासार्हता पुन्हा प्राप्त करता येऊ शकते. या विचारधारेतून नवलोक व्यवस्थापन संकल्पना विकसित झाली. नवलोक व्यवस्थापन व्यवस्थापन केंद्रित असून त्यात नागरिक संतुष्टी, सामाजिक कल्याण साध्य करण्यासाठी प्रभावी कार्यक्रम आखणी, वित्तीय संसाधने व मनुष्यबळाचे प्रभावी संचलन आणि गुणवत्तापूर्ण सेवा प्रदानासाठी सुधारणावर लक्ष केंद्रित केले जाते.

❖ **शोध निबंधाचा उद्देश :-**

प्रस्तुत शोध निबंधाचे उद्देश पुढील प्रमाणे आहेत.

1. नवलोक व्यवस्थापन संकल्पना अभ्यासणे.
2. नवलोक व्यवस्थापनाचे वैशिष्टये व परिणामांचा आढावा घेणे.

❖ **संशोधन पध्दती :**

सदर शोध निबंधासाठी ग्रंथालयीन व विश्लेषनात्मक संशोधन पध्दती तसेच मासीके, इंटरनेट इ. साधनांचा अवलंब केला आहे.

**नवलोक व्यवस्थापन संकल्पना** (Concept of New Public Managment)

नवलोक व्यवस्थापन दृष्टीकोनास उत्तर नोकरशाही प्रतिमान, बाजाराधिष्ठीत लोकप्रशासन, व्यवस्थापनवाद, व्यावसायिक शासन असेही म्हटले जाते. ओसबर्न आणि गॅब्लर यांनी उद्योगी सरकार, ख्रीस्टोफर हुड यांनी नवलोक व्यवस्थापन शब्दाचा प्रथम प्रयोग केला. ही संकल्पना / विचारधारा लोकनिवड सिध्दांत व व्यवस्थापनवाद यावर आधारीत आहे. जेन एरिक लेनच्या मते खाजगी क्षेत्रात प्रभावी ठरलेली व्यवस्थापकीय तंत्र, पध्दती सार्वजनिक क्षेत्रात लागु करणे म्हणजे नवलोक व्यवस्थापन होय.[1] क्रिस्टोफर पोलीट यांच्यामते 'नवलोक व्यवस्थापन' व्यापक कॉमन प्रशासकिय परिवर्तनासाठी वापरलेला शब्द आहे. लोकप्रशासनातील आदर्श उद्दिष्टे व व्यवसाय व्यवस्थापनातील सफलता व प्रदान, उत्पादकता (Output) यांचे एकत्रीकरण होय. नवलोक व्यवस्थापन धोरणापेक्षा, व्यवस्थापन, दक्षता, ग्राहकाभिमुखता, कृति प्रवर्तनेला प्राधान्य देते. नवलोक व्यवस्थापन दृष्टीकोन समाज व अर्थव्यवस्थेच्या विकासातील राज्याची पारंपारीक भूमिका बदलून बाजाराधिष्ठीत असणे बाजारोन्मुखी बनवणे याला प्राधान्य देतो. म्हणजेच व्यवस्थापन तंत्र, पध्दतीला महत्व दिले. 'लोक प्रबंध दृष्टीकोन विकसात हारवर्ड केनेडी स्कूल चे महत्वपूर्ण योगदान आहे. नवलोक व्यवस्थापन संकल्पना 1980 नंतर प्रामुख्याने चर्चेत आली असली तरी 1991 मध्ये क्रिस्तोफर हुड यांनी नवलोक व्यवस्थापन शब्दाचा प्रथम प्रयोग केला. ही संकल्पना / विचारधारा लोकनिवड सिध्दांत व व्यवस्थापनवाद यावर आधारीत आहे. जेन एरिक लेनच्या मते खाजगी क्षेत्रात प्रभावी ठरलेली व्यवस्थापकीय तंत्र, पध्दती सार्वजनिक क्षेत्रात लागु करणे म्हणजे नवलोक व्यवस्थापन होय.[1]

नवलोक व्यवस्थापन कुशलता, काटकसर, प्रभावशीलता (3-E-Efficiency, Economy, Effectiveness) प्राप्त करण्याला महत्व देते. बेबरच्या नोकरशाही प्रारुपावर टिका तर बाजारमूल्याचे समर्थन केले जाते. व्यावसायिक क्षेत्रातील व्यवस्थापन पध्दती व तंत्राचा लोकप्रशासनात प्रयोग करणे, खाऊजा या संकल्पनेचा सामना करण्यासाठी सार्वजनिक उद्योगांचे उत्कृष्ठ संघटन व व्यवस्थापन करणे, शासनास सार्वजनिक कार्यक्रम अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणे ऐवजी लाभाचे वितरक व परिवर्तनास सहाय्यक व प्रोत्साहन देणारे बनवणे, सरकारने सेवा क्षेत्रातील सर्व संधी खुल्या करुन पर्यायनिवडीची संधी व उत्कृष्ठ सेवांचा लाभ जनता घेईल अशी व्यवस्था निर्माणीला प्राधान्य नवलोक व्यवस्थापनात दिले आहे. ओसबर्न व गॅब्लर यांच्या मते नवलोक व्यवस्थेचा मूलभूत केंद्रबिंदू "We doint need more Government : we need better Government" आहे. तर 'प्रथम सेवा, लवचीकता, शासनाची पुर्नरचना हा नारा आहे.[2]

❖ **नवलोक व्यवस्थापन वैशिष्टयांचा आढावा :**

नवलोक व्यवस्थापनाचे वैशिष्टये[3]

1. नवलोक व्यवस्थापनामध्ये धोरणापेक्षा व्यवस्थापन, कार्यनिष्पादनाचे मूल्यांकन, क्षमतेवर लक्ष केंद्रित केले जाते.
2. सार्वजनिक नोकरशाहीचे विभाजन करणे जी कंत्राट / करार पध्दतीने कार्य करेल.
3. अर्ध बाजार व कंत्राट (ठेकेदारी) या माध्यमातून स्पर्धेला प्रोत्साहन देणे.
4. व्यवस्थापन शैलीला उत्पादन, नियम, वित्तीय बाबतीत स्वायत्तता प्रदान करणे.
5. खर्चात कपात / मितव्ययता.

ही वैशिष्टये मोहीत भट्टाचार्य यांनी आपल्या लोकप्रशासन के नये आयाम या पुस्तकात स्पष्ट केली आहेत.

'A public Management for all season' या शोधनिबंधात ख्रिस्तोफर हुड यांनी नवलोक व्यवस्थापन संकल्पनेची पुढील लक्षणे स्पष्ट केली आहेत.[4]

1. लोकप्रशासन / सार्वजनिकक्षेत्रात व्यवसायीक व्यवस्थापनाचा स्विकार करावा. तसेच त्यांना अधिक स्वातंत्र्य द्यावे.
2. स्पर्धेला प्रोत्साहन देवून खर्चात कपात करून उत्पादन व सेवांचा स्तर / दर्जात वृध्दी करणे.
3. मानक निश्चिती, कार्य मोजमाप व लक्ष्य निर्धारणावर भर.
4. संसाधन उपयुक्ततेमध्ये उच्च दर्जाची शिस्त व मितव्ययता.
5. व्यवहारात पारदर्शकता व जनसहभागाला प्राधान्य.
6. मोठ्या संघटना / अधिकरणांचे लहान घटकांत विभाजन करून सेवा अधिक चांगल्या प्रदान करणे.

'नवलोक व्यवस्थापन दोन विभिन्न विचार प्रवाहाचे लग्न होय. एक नवसंस्थात्मक अर्थशास्त्र (New institutional economics) तर दुसरे यशस्वी व्यवस्थापन जे सार्वजनिक क्षेत्रात उपयोगासाठी चे घटक / तंत्र होय.[5]

ओसबर्न आणि गैबलर यांनी आपल्या 'Re-inventing Government' या 1992 साली प्रकाशित केलेल्या पुस्तकात नवलोक प्रशासनाचे वैशिष्ट्ये स्पष्ट केली ती पुढील प्रमाणे आहेत.

उत्प्रेरक सरकार, समाजाभिमुख / समुदाय आधारीत शासन स्पर्धात्मक शासन, वृत्तिप्रवण शासन, परिणामोन्मुखी शासन ग्राहकाभिमुख शासन, उपक्रमशिल शासन, पुर्वानुमान, विकेंद्रित शासन, बाजारोन्मुखी शासन इ.

नवलोक व्यवस्थापनात नागरिकांना ग्राहक तर लोकसेवकांना (Public Servent) ना व्यवस्थापकीय दृष्टीकोनातून पाहिले जाते तसेच अधिकार विकेंद्रिकरण, स्वायत्ता, माहिती तंत्रज्ञानाचा कार्यात अधिक उपयोगाला प्राधान्य दिले जाते. 'क्लार्क व न्यूमन (Clarke and New Man) यांच्या 'The Managerial State' या पुस्तकामध्ये नवलोक व्यवस्थापन लोकप्रशासनाच्या परिवर्तनासाठी व्यवस्थापनाकडे वाटचालीला प्राधान्य देते असे म्हटले आहे. तसेच पारंपारिक संघटनांचे प्रतिमान व सार्वजनिक सेवा प्रदान, अधिकार परंपरा, नियोजन, केंद्रिकरण, प्रत्यक्ष नियंत्रण व स्वावलंबन या तत्वांना प्राधान्य देते. त्या ऐवजी संघटना व प्रशासनाचे बाजारोन्मुखी सार्वजनिक सेवा व्यवस्थापन व उद्यमी संस्कृती ला नवलोक व्यवस्थापनाच्या माध्यमातून प्राधान्य द्यावे यावर भर दिला.[6]

नवलोक व्यवस्थापनामुळे सार्वजनिक प्रशासन कार्यपध्दती, संघटन इ. घटकावर पडलेले प्रभाव / परिणाम- स्वायत्त सार्वजनिक संघटनांची स्थापना करण्यात आली. अंदाजपत्रक व कल्याण कार्यक्रमात कपात, लोकसेवा संरचनेत सुधारणा करण्यात येते. सार्वजनिक उपक्रमांचे खाजगीकरण, सरकार व नोकरशाहीत घट, कार्यमूल्यांकनाला महत्व प्राप्त झाले. अधिकारांचे विकेंद्रीकरण, सेवा प्रदान कार्य स्वयंसेवी संस्था, एजन्सी च्या माध्यमातून संविदा, कंत्राट पध्दतीने सुरु झाले. प्रशासन कार्यपध्दती व माहितीत पारदर्शकता व खुलेपणाला महत्व दिले. जनसहभाग व नागरीक सनदेची घोषणा, सेवा प्रदान कार्यात माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग व उत्कृष्ठ व्यवस्थापनास पुरस्कार इ.

थोडक्यात नवलोक व्यवस्थापनामुळे लोकप्रशासन, सार्वजनिक संघटनामध्ये सुधारणेला चालना मिळाली.

**संदर्भ सुची :**

1. डॉ.बी.एल. फडीया, लोकप्रशासन- साहित्यभवन पब्लीकेशन आग्रा- 2006, पृ.161
2. डॉ.बी.एल. फडीया, लोकप्रशासन- 2006, पृ.163
3. मोहित भट्टाचार्य, लोकप्रशासन के नये आयाम जवाहर पब्लिशर्स- नई दिल्ली-2011, पृ.374
4. डॉ.बी.एल. फडीया, लोकप्रशासन- 2006, पृ.162
5. Chirstopher Wood, 'a public management for all seasons ?' Public Admi. Vol.69 spring 1991, P.05.
6. R.P. Gajanan, Sharma Anoop, Pub-Administration New Delhi- 2011, P.227.